वाचले :
१. ठराव क्रमांक २५४, दिनांक ०१/०२/२००८
२. दिनांक - २१/०२/२००८ रोजीची मंजूर टिपणी.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
करआकारणी व करसंकलन विभाग
क्रमांक : कर/मुख्य/७/कावि/६५८/२००८
दिनांक : २५/०३/२००८

**<u>विषय</u> : <u>इको हौसिंगकामी सामान्य करामध्ये द्यावयाच्या</u>**
१५% सूट देणेकामी योजना कार्यान्वित करणेबाबत

आदेश,

उपरोक्त वाचले क्रमांक १ नुसार मा. महापालिका सभेने इको हौसिंगकामी सामान्य करामध्ये १५% सूट देणेस मान्यता दिलेली आहे. सदर बाबतची अंमलबजावणी करणेकामी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निम्नलिखित असेसमेट रजिस्टरला नोंद असलेल्या व मार्च २०११ पर्यंत नोंद होणा-या मिळकतीमध्ये पावसाचे पाणी पुनर्भरणाची व्यवस्था करण्यात येईल, कच-यावर प्रक्रिया करुन खतनिर्मिती मिळकतींच्या आवारातच होईल तसेच अपारंपारिक उर्जेचा वापर करण्यासाठी यंत्रणा बसवतील अशा मिळकतींना महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाने प्रमाणित केल्यास करयोग्यमूल्याच्या टप्प्यानुसार दरवर्षी सामान्य कराची जी रक्कम येईल त्या रक्कमेच्या १५% सूट चालू आर्थिक वर्षापासून मार्च २०११ पर्यंत लागू राहिल.

**गृहनिर्माण सोसायटी, अपार्टमेंटस, गृहनिर्माण संस्था, स्वतंत्र बंगले / स्वतंत्र सदनिका, औद्योगिक मिळकती, व्यापारी इमारती इत्यादी**

(तथापि, माहिती तंत्रज्ञान [Information Technology] अंतर्गत येणा-या इमारतींना सदरची सवलत लागू नाही.)

याकामी अर्जदार करसंकलन विभागीय कार्यालय, करसंकलन मुख्य कार्यालय अथवा नागरी सुविधा केंद्रात अर्ज देऊ शकतील. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर करसंकलन विभागाकडून संबंधित अर्ज कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा, कार्यकारी अभियंता, विद्युत व सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात येईल व त्याची एक प्रत बांधकाम परवानगी विभागास दिली जाईल. उपरोक्त विभागातील अधिकारी जागेवर समक्ष पाहणी करुन विहित नमुन्यात अभिप्राय बांधकाम परवानगी विभागास सादर करतील. त्यानंतर सदर अभिप्रायास अनुसरुन बांधकाम परवानगी विभाग विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र करसंकलन विभागास सादर करतील व त्याप्रमाणे करसंकलन प्रमुख सामान्य करामध्ये १५% सवलत

देण्याबाबत आदेश निर्गमित करतील याबाबत संबंधित विभागाची कार्यपध्दती व विहीत नमुने त्या त्या विभागाने अंतिम करावी. इको हौसिंग बाबत जनजागृती त्या विभागाने त्यांच्या स्तरावर करावी.

**सही/-**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,
१. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग
२. कार्यकारी अभियंता, विद्युत
३. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४. सहाय्यक आयुक्त, नागरी सुविधा केंद्र
५. उपशहर अभियंता, बांधकाम परवानगी विभाग

**सही/-**
करआकारणी व करसंकलन प्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.